# मराठी भाषा दिन

"लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी

जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी "

मराठी ही आपल्यासाठी केवळ एक भाषा नसून ममतेचे, वात्सल्याचे आणि संस्काराचे बोल आहेत. मराठी भाषा सामर्थ्यवान आणि सुंदर आहे.

27 फेब्रुवारी हा दिवस कवी विष्णू वामन शिरवाडकर म्हणजे आपल्या सर्वांचे कवी ,लेखक, नाटककार कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस.  कवी कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा केला जातो व त्या अनुषंगाने तो दिवस आमच्या शाळेतही मोठ्या उत्साहाने साजरा केला.

मुलांना मराठी भाषेची गोडी लागावी तसेच मराठीचे उच्चार, मराठीतील कविता याविषयी माहिती मिळावी म्हणून २०/२/२३ ते २७/२/२३ पासूनच मराठी सप्ताहाला सुरुवात झाली. त्या सप्ताहामध्ये निरनिराळे उपक्रम आमच्या शाळेत राबविले गेले. जसे मराठीत प्रार्थना सभा, हस्ताक्षर स्पर्धा ,मराठी सुविचार ,म्हणी, मराठी संस्कृतीवर तक्ते बनवण्याच्या स्पर्धा घेण्यात आल्या व विद्यार्थ्यांना प्रोत्साहन म्हणून त्यांना प्रमाणपत्र देण्यात आली.

मराठी भाषेला एक सुंदर अशी परंपरा लाभलेली आहे ती म्हणजे लोकनृत्याची ते लोकनृत्य टिकून राहावे ,विद्यार्थ्यांना मराठीची संस्कृती- रितीरिवाज कळावे  या अनुषंगाने 27 फेब्रुवारीला आमच्या शाळेत 'आंतरशालेय मराठी लोकनृत्य स्पर्धा' ठेवण्यात आली होती. या स्पर्धेत एकूण पाच शाळांनी भाग घेतला होता त्या कार्यक्रमाचे निर्णयक सौ. स्नेहा शिंदे व श्री. विशाल कांबळे यांना आमंत्रित करण्यात आले होते .कार्यक्रमाची सुरुवात ठीक साडेदहा वाजता झाली व त्या स्पर्धेमध्ये प्रथम पारितोषिक सेंट जोसेफ हायस्कूल, वांद्रे व द्वितीय पारितोषिक फादर आग्नेल हायस्कूल व अंजुमन इस्लाम या शाळेने पटकावले खरंच या स्पर्धेमुळे मराठी बाणा व संस्कृतीची जोपासणी केली गेली. प्रत्येक शाळेचे लोकनृत्य डोळ्याचे पारणे फेडील असे होते. फारच रोमांचक असा हा कार्यक्रम साजरा झाला शेवटी सिस्टर आरोकिया यांनी आभाराचे दोन शब्द बोलून दुपारी साडेबारा वाजता कार्यक्रमाची सांगता केली.

शिक्षिका-

सुनिता फुट्यार्डो.